कृपया प्रसिध्दीसाठी

## नैसर्गिक अरण्य निर्मितीचा प्रयोग पानशेतजवळ सुरू

पुणे, १७ मे - पानशेत धरणाजवळील खडकाळ आणि माती धुवून गेलेल्या जमिनीवर अरण्याचे पुनरूज्जीवन करण्याचा प्रयोग पुण्याच्या इकॉलॉजिकल सोसायटीने यशस्वीरीत्या सुरू केला आहे. सहा वर्षांपूर्वी सुरू केलेल्या या प्रयोगात टप्याटप्याने एकूण १२ हेक्टर जागेला संरक्षण देण्यात आले. या ठिकाणी नैसर्गिक प्रक्रियेतून अरण्यनिर्मिती करण्याच्या प्रदीर्घ प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे अशी माहिती पुण्यातील "इकॉलॉजिकल सोसायटी" या संस्थेचे अध्यक्ष श्री. एल. जी. राजवाडे व विश्वस्त श्री. प्रकाश गोळे यांनी बातमीदारांना दिली.

या प्रयोगाची माहिती देतांना ते पुढे म्हणाले की, याठिकाणाची माती पानशेतचे मातीचे धरण बांधण्यासाठी काढण्यात आली. तेथे माती तयार करणे हे पहिले काम होते. म्हणून गुरांची व माणसांची रहदारी थांबवून गवत व तणांची वाढ होऊ देण्यात आली. अगदी खडकावरसुध्दा हवेतल्या आर्द्रतेवर जगणारी लायकेनसारखी वनस्पती वाढली. नंतर खुरट्या वनस्पती आणि गुरे खाऊ शकतील असे गवत वाढले. तसेच गुरे ज्यांना तोंड लावित नाहीत अशी झुडुपे वाढली. गवत व झुडुपांनी जमिन झाकली गेल्याने मातीचे तपमान कमी झाले. त्यामुळे गांडुळांसारखे प्राणी जमिनीत वाढून जमिन भुसभुशीत व्हायला मदत झाली.

या जमिनींत पक्षी, खारी व वटवाघूळांमार्फत स्थानिक झाडांच्या बिया टाकल्या गेल्या. झुडुपांच्या तळाशी त्यांना संरक्षण आणि रूजण्यासाठी मऊ माती व आर्द्रता मिळाली. हळूहळू ही रोपे मोठी होऊन झुडुपांशी स्पर्धा करून तेथे स्थानिक झाडांचे पुनरूज्जीवन झाले आहे. ऐन, किंजळ, हिरडा, बेहडा, आसना, तोरण, अंजनी, कुंभ, इत्यादि स्थानिक झाडे येथे रूजली आहेत. तसेच बांबू, साग, सुबाभूळ, चा-याची झाडे ही देखील उभी राहत आहेत. उन्हाळ्यातही जगणारे चांगल्या प्रतिचे गवत आता या अरण्यात उगवते. या जागेला दिलेले संरक्षण असेच चालू राहिले तर येत्या काही वर्षांत येथील वातावरणास योग्य असे, स्थानिक वनस्पतींनी भरलेले एक उत्तम अरण्य तयार होईल. झाडे नर्सरीत वाढवून, खड्डे घेऊन ती झाडे लावून वाढवण्यास जेवढा खर्च येतो, त्याच्या एक तृतीयांश खर्चात हे अरण्य तयार होईल, असे श्री. प्रकाश गोळे यांनी सांगितले. हे अरण्य केवळ माणसालाच नव्हे तर सृष्टीतील इतर सर्व जीवांना अनुकूल असेल.

इकॉलॉजिकल सोसायटीने उजनी धरणाच्या परिसरात जलाशय विकास योजनाही राबवली आहे. येथे पक्षी अभयारण्य करण्याचा प्रस्ताव अगोदरपासून होताच. पण त्यामध्ये पक्ष्यांसाठी जे आसरे तयार करायचे ते शास्त्रशुध्द रीतीने तयार केल्यास त्याचा माणूस व त्याची गुरे यांनाही उपयोग होऊ शकतो असे आढळून आल्याने संस्थेतर्फे तेथे उपयुक्त गवते, औषधी वनस्पति व पाण्यातही वाढणारे वृक्ष यांची लागवड करण्यात आली.

या प्रयोगाला केंद्र व महाराष्ट्र सरकारने उत्तम सहकार्य दिले. सरकारतर्फे उजनी जलाशयाच्या काठावरील पक्षी अभयारण्याची सीमा निश्चित करण्यात आली होती. या सीमेच्या आत अनेकांची जमिन येत असल्याने सरकार अभयारण्यासाठी जमिनी ताब्यात घेणार असा लोकांचा समज झाला. त्यामुळे अभयारण्याला विरोध सुरू झाला. संस्थेने मात्र पर्याय म्हणून उजनी जलाशयाची सर्वांगीण परिसर विकास योजना राबविली. महाराष्ट्र सरकारच्या सिंचन विभागानेही संस्थेला सहकार्य दिले.

संस्थेने जलाशया भोवतीच्या गावांची पाहणी करून लोकांच्या गरजा समजावून घेतल्या. तसेच तेथील पक्ष्यांचा व प्राण्यांचा अभ्यास करून त्यांच्याही गरजा समजावून घेतल्या. त्यानुसार जलाशयाभोवती आवश्यक ती कामे ही करण्यात आली. तेवढयात

अभयारण्य विरोधी आंदोलनाने उग्र स्वरूप धारण केल्याने हे काम बंद पडले. नाहीतर कोणाच्याही जमिनी ताब्यात न घेता उजनी जलाशयाच्या परिसर विकासाची अभिनव योजना साकार झाली असती. ती तेथील रहिवासी आणि पक्षी व प्राणी या दोघांनाही कल्याणकारी होती.

अभयारण्यासाठी लोकांच्या जमिनी ताब्यात घेण्याची अजिबात गरज नाही असे संस्थेचे मत आहे. सध्या संस्थेतर्फे अरुणाचल प्रदेश व हिमालयामध्ये पक्षी आणि माणूस या दोघांनाही कल्याणकारी होईल अशी योजना राबवण्यात येत आहे. तेथील शाळा-चालक व विद्यार्थी या योजनेला सहकार्य देत आहेत.

--------- x ---------

प्रकाश गोळे
विश्वस्त
इकॉलॉजिकल सोसायटी,
१-बी, अभिमानश्री सोसायटी,
पाषाण रोड, पुणे - ४११ ००८. फोन - ३३ ६४ ०८.

## Natural Forest Coming Up Near Panshet

PUNE, 17 May - The Ecological Society of Pune has successfully carried out an experiment of recreating natural forest on the rocky and eroded soil near the Panshet dam. Twelve hectares of land has been protected through different stages in this experiment which started six years ago. A long-term process of creating **forest** through natural process has begun here. This information was given to reporters by Mr. L.G. Rajwade, Chairman, and Mr.Prakash Gole, Trustee, of the Ecological Society.

They further said that the soil in this area was excavated for constructing an earthern dam at Panshet. Hence, the very first job was to create a layer of soil on this land. The traffic of cattle and men was stopped to allow the growth of grass and shrubs. The first to appear was Laiken and the vegetation of a likewise variety which, merely on the strength of the humidity in the air, can even grow on rocks. Next came the shrubs and the grass. A few plants that cattle do not eat also appeared on the soil and, due to the greenery, the soil temperature started coming down. The soil was softened further by the growth of worms.

Seeds of the local trees were dropped in the soil by birds, squirrels and bats roaming the region. The seeds, protected by the soft soil and the shrubs, took root and soon outnumbered the shrubs around. Today, a lot of the local variety of the trees have come up; like that of Aain, Kinjal, Hirda (Tanin), Behada, Asana, Toran, Anjani, and Kumbh etc. Bamboo, teak, Subabhul and fodder have also come up. Today, the soil is covered with grass that can survive the heat of summer. The time is not far way when a proper atmosphere-friendly forest, full of local plants and trees would see the light of day. This process costs only one-thirds of the cost of preparing pits and planting saplings from the nursery said Mr.Prakash Gole. This kind of forest would benefit mankind and rest of the living things alike.

The Ecological Society has also undertaken the Wetland Development Scheme in the vicinity of the Ujani dam. A proposal to turn the land into a bird sanctury was already prepared. In this connection, the Society felt that if, in addition to other things concerning the development of the bird sanctuary, natural habitants of birds could be created scientifically, it could further benefit men and cattle. In keeping with this thought, the Society planted necessary grass, medicinal plants and vegetation that grew in water.

The State and the Central Govt. extended excellent co-operation to this project and the area of the bird sanctuary was decided upon.

Since the marked territory for the sanctuary ran through a few private lands, a rumour as to the Govt. trying to acquire their land for the purpose, started circulating and a protest movement against the sanctuary was organised. However, as an alternative to this, the Ecological society undertook an integrated development plan for this entire area. The Irrigation Department of the Govt. of Maharashtra extended their full support to the Society.

The Society conducted a survey of the needs of people residing around the lake. It also surveyed the needs of the birds and animals frequenting the area. Accordingly, necessary developmental work was immediately carried out. But before the Society could see its project materialise, the anti-sanctuary movement gained force and the work on this project was totally stopped. If this had not happened, we could have witnessed a unique scheme benefitting the mankind and animals alike without grabbing anybody's land.

The Society feels that it is not at all necessary to deprive people of their private lands for creating a sanctuary. At present, the Society is working on a developmental project beneficial for man and birds alike in Arunachal Pradesh and the Himalayan region. The projects there, are being supported by the local educational bodies and the students.

------------ x ------------

Prakash Gole
Trustee
Ecological Society, 1 B, Abhimanshree Society, Pashan Road,
Pune - 411 008, Phone : 33 64 08.